पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १८

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०६/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०६/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
३) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
४) मा. मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.साळवी, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४) स्थापत्य विषयक कामामध्ये स्थान बदल ( Change of site ) करण्यास मान्यता देणेबाबत ...

विषय क्र.५) बस स्टेशन बांधणेच्या जागेतील बदलास ( Change of site ) मान्यता मिळणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) चिंचवड प्रभाग क्र.२२ मधील स्थापत्य उद्यान विभागाकडील कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक : ८९ विषय क्रमांक : १
दिनांक : ०५/०६/२०१५ विभाग – क क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.समीर मासुळकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षे/स्था/१/कावि/२०९०/२०१५, दि.१५/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या व महाराष्ट्र राज्य कब्बडी असोशिएशन, पुणे जिल्हा कब्बडी असोशिएशन यांच्या मान्यतेने दि.३१/०३/२०१५ ते ०३/०४/२०१५ या काळात सांगवी येथील पी.डब्लू.डी. मैदानात महापौर चषक राज्यस्तर कब्बडी स्पर्धा २०१५ आयोजित करण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रस्तुत ठिकाणी मंडप विषयक कामे करणे, उदा.स्टेज, प्रेक्षक गॅलरी, मंडप, खुर्च्या, कमानी, तसेच खेळाडूंसाठी राहण्याची व्यवस्था आदी कामे करणे आवश्यक आहे. सदर बाबींचा समावेश असलेल्या कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे व त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १९,३१,६००/- इतकी येत आहे. सबब कामाची तातडीची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण ५ (२) नुसार प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय रकमेपर्यंतच्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९० विषय क्रमांक : २
दिनांक : ०५/०६/२०१५ विभाग – उद्यान स्थापत्य
सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/१२६/२०१५, दि.१९/०५/२०१५

विषय - प्रभाग क्र.१७ श्री ज्ञानेश्वर उद्यानातील सिमाभिंतीचे नुतनीकरण करणे.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९१ विषय क्रमांक : ३
दिनांक : ०५/०६/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/इक्षे/६७१/२०१५, दि.२७/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्र.क्र.७ च-होली भागातील आळंदी यात्रेसाठी मॅगझीन चौक व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.२०,००,०००/- ( अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) चे पूर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ९२ विषय क्रमांक : ४
दिनांक : ०५/०६/२०१५ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/५२६/२०१५, दि.०५/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शिवाजी चौक हिंजेवडी ते पिं.चिं.म.न.पा. हद्दीपर्यंत रस्ता अरुंद असल्याने तेथे मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. मा.विभागीय आयुक्त कार्यालयात याबाबत मा.पालकमंत्री पुणे जिल्हा, मा.आमदार चिंचवड, व इतर पदाधिकारी तसेच मा.आयुक्त, पिं.चिं. म.न.पा., मा.आयुक्त, पुणे म.न.पा., कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.), कार्यकारी अभियंता (म.औ.वि.म.), मा.उपायुक्त, शहर वाहतूक पुणे यांची दि.०७/०५/२०१५ रोजी बैठक झाली असून सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड मनपाने सदर रस्त्याचे सुमारे ५०० मी लांबीचे दोन्ही बाजूस ४.३० मी. रुंदीचे रुदीकरणाचे काम पावसाळयापूर्वी करणेबाबत निर्णय झाला आहे. मनपाचे सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात सदर ठिकाणी काम करणेस मा.मनपा सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. निविदा काढून सदर काम करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने सध्या चालू कामातून सदर काम करण्याचे नियोजन आहे.

सांगवी किवळे रस्त्यावर माहे जुलै २०१५ मध्ये बीआरटीएस बस सेवा सुरु करण्याचे नियोजन आहे. सदर रस्त्यावरील साई चौक, (जगताप डेअरी) ते ताथवडे चौकापर्यंत PMPML च्या ब्रेक डाऊन बसेस उभ्या करणेसाठी सेंट्रल मिडीयन चे कर्बिग काढून तेथील जागेचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी सर्व्हे करुन सुमारे ८ ठिकाणी दोन्ही बाजूस ३० मी. इनक्लाईन व ४० मी. सरळ सेंट्रल मिडीयनचे कर्बिंग काढून ब्रेक डाऊन बसेस उभ्या राहण्यासाठी रस्त्याचे डांबरीकरण करुन जागा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. निविदा काढून सदर काम करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने सध्या चालू कामातून सदर काम करण्याचे नियोजन आहे.

वरील दोन्ही ठिकाणचे कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी खालील निविदा कामामधील जागेतील बदलास (Change of site) मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | सध्या चालू असलेल्या कामाचे नाव | नियोजित ठिकाणच्या रस्त्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १०/३-२०१४-१५ | मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे ते भक्तीशक्ती चौकापर्यंत ४५ मी रस्ता विकसित करणे भाग १ | शिवाजी चौक ते हिंजवडी ते पिं.चिं.म.न.पा.हदद. |
| २ | १०/२-२०१४-१५ | बोपखेल ते आळंदी रस्ता विकसित करणे भाग क्र.२ (साखळी क्र.७/०४० ते ८/२५० कि.मी.) | सांगवी किवळे रस्ता येथील साई चौक ( जगताप डेअरी ) ते ताथवडे पुनावळे चौका पर्यंत. |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९३ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०५/०६/२०१५

सुचक : मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा.समीर मासुळकर

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सांगवी ते किवळे रस्ता, नाशिक फाटा ते वाकड रस्ता या दोन बी.आर.टी.एस.मार्गावर जून अखेर बी.आर.टी. बस सेवा सुरु करण्याचे नियोजन केले आहे. सद्या या बीआरटी मार्गावरील बस स्टेशन्स बांधणेचे काम वेगाने चालू आहे. या बस स्टेशनची कामे वेळेत पुर्ण होण्यासाठी खालील निविदा कामांमधील बस स्टेशन बांधणेच्या जागेतील बदलास ( Change of site ) करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | निविदा क्र. | बीआरटी बसस्टॉप मंजूर संख्या | सध्याचा बीआरटी कॉरीडॉर क्र. | नियोजित बस स्टेशन बांधावयाचा कॉरीडॉरचे नाव व क्र. | नियोजित बांधावयाच्या बस स्टॉपची संख्या | जागा बदलण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/१ २०१३-१४ | १० | ४ | २ – (सांगवी किवळे रस्ता भाग १)<br>२ - (सांगवी किवळे रस्ता भाग २)<br>३ - (नाशिक फाटा ते वाकड रस्ता भाग १ व २) | २<br>२<br>२ | काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्याचे काम चालू असल्याने साईट उपलब्ध होत नाही. फक्त १० पैकी ४ बस स्टेशनचे काम झालेले आहे. उर्वरित ६ बस स्टेशनचे काम कॉरीडॉर २ व ३ मध्ये करण्याचे नियोजन आहे. |
| २ | २४/३ २०१३-१४ | १० | ४ | २ – (सांगवी किवळे रस्ता भाग ३)<br>१ - (दापोडी ते निगडी रस्ता भाग १ व २) | २<br>४ | काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्याचे काम चालू असल्याने साईट उपलब्ध होत नाही. फक्त १० पैकी ४ बस स्टेशनचे काम झालेले आहे. उर्वरित ६ बस स्टेशनचे काम कॉरीडॉर २ व १ मध्ये करण्याचे नियोजन आहे. |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९४ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०५/०६/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

चिंचवड प्रभाग क्र.२२ मधील चालू असलेले काम चिंचवड येथील पार्वती उद्यानात नैसर्गिकदृष्ट्या सुशोभिकरण करणे व साधु संतांची, संत साहित्याची माहिती प्रगट करणारे म्युरल्स उभारणे ( निविदा नोटीस क्र.१९/१-२०१३-१४) या कामाच्या सुधारित र.रु.४९,५०,०००/- ( अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त ) चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४५० /२०१५
दिनांक : ०६/०६/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.